॥ श्रीआनंदमूर्ति प्रसन्न ॥

शास्त्रीय-ताल-प्रकाश.

(भाग १ ला.)

लेखक व प्रकाशक

सीताराम गोविंद ब्रम्हनाळकर

अध्यक्ष व चालक

श्रीजगद्गुरु संगीत विद्यालय, सांगली.

आवृति पहिली प्रती १०००

सन १९२४ इसवी

किं. १ रुपाया

मुद्रक:- पं. बाहुबलीशर्मा, श्रीमहावीर प्रेस, सांगली.

॥ श्रीआनंदमूर्ति प्रसन्न ॥



शास्त्रीय–ताल–प्रकाश.

(भाग १ ला.)

लेखक व प्रकाशक

सीताराम गोविंद ब्रम्हनाळकर

अध्यक्ष व चालक

श्रीजगद्गुरु संगीत विद्यालय, सांगली.

आवृति पहिली प्रती १०००

सन १९२४ इसवी

किं. १ रुपाया

(८)

शास्त्रीय ताल प्रकाश.

॥ प्रास्ताविक चार शब्द ॥

संगीत हा विषय आबालवृद्ध स्त्री पुरुषानांच प्रिय नसून, अगदी क्षुल्लक कृमिकीटकापासून तो थेट देवदेवागंनापर्यंत सर्वांनाच सारखा प्रिय आहे. गायन, वादन, व नर्तन या तिनही विषयांचा समावेश 'संगीत' या शद्बांत शास्त्रकारांनीं केला आहे. या तीनींही विषयापैकीं एखादा किंवा तीनही न आवडणारा प्राणी पृथ्वीच्या पाठीवर क्वचितच दृष्टीस पडावयाचा, गाण्या वाजविण्याची, किंवा वाचण्याची रीति निरनिराळ्या देशमानानें भिन्न असली तथापी संगीत या शद्बांत त्याचा अंतर्भाव होण्यास कांहीं हरकत नाहीं. म्हणून भिन्नभिन्न देशांतील लोक आपआपल्या बुध्यनुसार संगीत सुखाचा अनुभव घेत आले आहेत; केवळ मनुष्यालाच संगीत आवडतें असें नसून, देवादिकांनाही त्याची आवड असल्याची वर्णनें आमच्या पुराणांतरी आहेत. नृत्य करणाऱ्या अप्सरांचें वर्णन सर्व विश्रुतच आहे. या पुराण कालाच्याही पलीकडील वेद कालीं सुध्धा संगीत हें होतेंच; व त्याचाच पुरावा आपल्याला सामवेदावरून पूर्ण पटतो.

इंद्रवरूणादिकांची स्तुती केवल वैदिक मंत्र म्हणूनच करावयाची

नसून ती स्तुती त्या त्या गायन पद्धतीनेंच जाहली पाहिजे अशी वैदिक धर्माची आज्ञा आहे. अर्थात् या वरून आपल्यास सहज समजून येतें कीं, हजारों वर्षांपूर्वी, वेद कालापासून संगीत हें आहेच; तें कांहीं आधुनिक कालांत नवीन कोणी शोधून काढिलें नाहीं आम्हांस तर असें वाटतें कीं, सृष्टीच्या उत्पति बरोबरच संगीतही उत्पन्न जाहलें आहे. कारण कित्येक पक्ष्यांमध्येही निसर्गसिद्ध गायनाची लकेरी दृष्टीस पडते. जंगलांतून फिरतांना पक्ष्यांचा मधुरालाप पुष्कळांच्या कानीं पडला असेल; तसेच आनंदानें पशु पक्ष्यादिकही नाचतांना पुष्कळानीं पाहिले असतील. प्राणी मात्राला प्रेमाचें भरतें आलें म्हणजे तो आनंदानें नाचूं लागतो व गाउं लागतो हें जें निसर्गसिध्य गायन, नर्तन, याला फक्त पुढें कालांतरानें नियमबद्धता आली व तीच नियमबद्धता, देशकाल भेदामुळें भिन्नभिन्न रितीनें आज आपल्या पुढें येत आहे आणि यासच आपण शास्त्र असें म्हणतो. शास्त्रानीं किंवा शास्त्र कारांनीं, संगीत, म्हणजे गायन, वादन, नर्तन हे उत्पन्न केले नसून त्याजविषयीं नियम घालून दिले इतकेंच संगीताची खरी उत्पत्ती प्रेममय ब्रम्हस्वरूपापासून आहे. त्याची स्थितीही प्रेमांतच आहे. = पर्यावसानही प्रेमांत व आनंदांतच जाहले पाहिजे. इतर शास्त्रीय विषयासारखा हा संगीत विषय केवळ चर्चे-

चाच नसून, तो सर्व प्राणि मात्रांना आनंदमग्न करणारा आहे. संसारांत कोणत्याही रीतीच्या यातना होवोत, मन कितीही उद्विग्न असो, चिंताज्वरानें अंतःकरण भाजत का असेना, परंतु तशा स्थितींत सुद्धां जर का मधुरालाप कानावर पडला तर तत्काल अंतःकरणास समाधान झालेंच पाहिजे. गायनाचा राग कोणता, ताल कोणता, मात्रा किती वगैरे गोष्टी जरी सामान्य जनतेला समजल्या नाहीत तथापि गायनाची गोडी त्यांना समजल्या वांचून रहात नाहीं. साखर जशी कोणत्याही प्रसंगी गोडच लागते, गुलाबाचा सुगंध जसा कोणत्याही स्थितींत आनंदच देतो, तसेंच संगीत हें कोणत्याही समयीं मनुष्य मात्रांना सुख देणारें आहे. जगतांत दारिद्र्यमय स्थितींत बहुधा कोणालाच समाधान नसतें परंतु संगीताचें अध्ययन केलेले लोकमात्र दारिद्र्यमय स्थितींत सुद्धा पूर्ण आनंदी दृष्टीस पडतात, असा संगीताचा प्रभाव आहे. ब्रह्मज्ञान्याच्या सुखाला जशी त्याच्या स्वात्मानुभवा खेरीज इतर कोणत्याही वस्तूची गरज नाहीं तसेंच संगीताभिज्ञालाही आनंद मग्न होण्यास त्याच्या एका संगीतावांचून इतर कोणत्याही वस्तूंची आवश्यकता नाहीं गायन वादना पासून होणारा आनंद स्वतःलाच होतो असें नसून त्याचे भागीदार अनेकांस करतां येते.

संगीत हें एक मोहिनी अस्त्र आहे. अस्त्रानें वाटेल त्यांचें अंतःकरण आपल्याकडे खेचतां येतें. अगदीं परकीय मनुष्याला आपला परमदोस्त करितां येतो. संगीतानें जितके मित्र करिता येतात तितके इतर कोणत्याही साधनानें होत नाहींत. दुसऱ्याच्या अंतःकरणास प्रेमाचा पाझर फोडणारी ही एकच विद्या आहे. वाटेल त्या प्रसंगी प्राणिमात्रांना आनंदानें डोलावण्याचें सामर्थ्य याच विद्येंत आहे. सुंदर गायन वादनाच्या स्मरणानें सुद्धा जर क्षणभर मन आनंदित होतें तर प्रत्यक्ष त्याच्या अनुभवानें मन आनंदमग्न होईल यांत नवल तें काय?

संगीत ह्मणजे गायन, वादन, व नृत्य असा अर्थ पुर्वी सागितलाच आहे गायन ह्मणजे कंठातून उत्पन्न होणारा स्वर व त्यांचे अनेक विध प्रकार असा अर्थ आपल्यास करण्यास कांहीं हरकत नाहीं. वादन या शद्बानें बीन ताऊस, सतार, दिलरुबा इत्यादी तंतुवाद्याच्या सहायानें वाजविला जाणारा बाज, तसेच आधुनिक हार्मोनिय, तबला, आणि प्राचिन पखवाज, डमरु वगैरेच्या सहायानें वाजविण्यांत येणारा बाज, या सर्वांचा संग्रह वादन या शब्दानें करावा असा संगीत शास्त्रकारांचा अभिप्राय आहे; व हा इतका विस्तृत अर्थ दर्शविण्या करितां त्यांनी फक्त "वाद्य" या शब्दाचाच प्रयोग--

" गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीत मुच्यते "

या संगीताच्या व्याख्येंत केला आहे. नृत्य म्हणजे नाचणें असा साधा अर्थ आहे. या शद्वाच्या अर्थाविषयीं कांहीं भानगड नाहीं.

आतां, या संगीतास मुख्य आधार, तालाचा आहे. तालावांचून संगीत पूर्ण होऊं शकत नाहीं. तालाची किटकिट संगीतास काय करावयाची आहे नुसतेच गायलें किंवा नुसताच बीन वाजविला तर बस नाहींका होणार? त्या पासून कानास गोडी नाहींका लागणार? असा कित्येकांचा या ताला संबंधी प्रश्न आहे. परंतु भाषेला जशी व्याकरणाची किटकिट, व मनुष्याच्या वर्तनाला जशी धर्मबंधनाची आणि राजाच्या कायद्याची किटकिट, तशीच सर्व प्रकारच्या संगीताला तालाची किटकीट ही अवश्यकच आहे. वस्तुतः ती किटकीट त्या संगीताच्या सौंदर्याला खुलविणारें मुख्य भूषण आहे. संगीताचा मुख्य उद्देश, स्वतःच्या एकरूपतेनें श्रोत्रवर्गाच्या अंतःकरणांत समाधान उत्पन्न करण्याचा आहे. गाणें तालबद्ध नसलें तर त्याजबरोबर पखवाज किंवा तबला कसा वाजणार? तबला किंवा पखवाजावाचून नुसतेच गाणें किंवा नाचणें लंगडें व एकांगी दिसतें. त्यापासून अंतःकरणास व्हावें तसें समाधान होणार नाहीं. याज विषयीं ग्रंथ-

कारांचें प्रमाण, श्लोक स्वरगीतस्य चानंदो ॥ तालसौभाग्यकलय: एक हजार रुपये एखाद्यास बक्षीस दिलें असतां जितका संतोष होतो त्याच्या दुप्पट संतोष दोन हजार रुपये दिल्यानें जाहलाच पाहिजे हा जसा सृष्टिसिद्ध नियम आहे तसेंच, गायनरूपी एका संगीतानें जितका आनंद होतो, त्याच्या दुप्पट आनंद, वादनसहित गायनानें जाहलाच पाहिजे, व गायन, वादन यांनीं युक्त अशा नृत्यानें तिप्पट आनंद जाहला पाहिजे असाही साहजिकच अर्थ निघतो. याचें प्रत्यंतर आपल्याला नेहमीं व्यवहारांत पहावयास सापडतें. कोणीतरी गोड आवाजानें एखादें पद ह्मणूं लागला तर त्याच्या भोंवताली जितके लोक जमतील त्याच्या दुप्पट लोकसमूह तबल्याच्या सहायानें जमणें शक्य आहे. या शिवाय नुसतें जरी गाणें असलें तथापि त्याला तरी कांहींना कांहींतरी निर्बंध हा पाहिजेच आहे. नाहींतर, आरंभ कोठून व शेवट कोठें याचा पत्ताच लागावयाचा नाहीं. आलाप कोठून घ्यावयाचे व कोठें संपवावयाचे याचा नियम तालावांचून बांधता येणें शक्य नाहीं, ह्मणून ताल हा गायन, वादन, व नर्तनात्मक संगीताचा प्रत्यक्ष आत्माच आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. नुसत्या गायनास सुद्धां जर तालाची आवश्यकता आहे, तर त्या गायनाबरोबर तबला वगैरे वाजविण्यास तालाची आवश्यकता

भासेल यांत काय आश्चर्य आहे? तालाच्याच आधारानें गायन व वादन चाललें पाहिजे व तें तसें चाललें तरच त्यांत एकरूपता उत्पन्न होऊन श्रोतृवृंदांना आनंद होईल. हीच गोष्ट नृत्यासही लागू आहे. ताल हा सर्वत्र पाहिजेच आहे. ताल हा पाया आहे. या पायावरच गायन, नर्तन, वादनांच्या अनेक मजली इमारती उठवावयाच्या असतात. व हा पाया जितका मजबूत असेल तितक्या त्या इमारती टिकाऊ व आनंद देणाऱ्या होतात. ह्मणूनच--

॥ गीतं वाद्यं तथा नृत्यं यतस्ताले प्रतिष्ठितम् ॥

असें शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. सर्व प्रकारच्या संगीताला " ताल व लय" याचे एकप्रकारचें बंधनच आहे असे ह्मटलें पाहिजे. परमात्म्याला जसें शरीराचें बंधन, विजेला किंवा, वाफेला जसें त्या त्या मशिनरीचें बंधन, हें ज्याप्रमाणें परमात्म स्वरूपाचें, विजेचें किंवा वाफेचें लोकोत्तर सामर्थ्य जनतेच्या प्रत्ययास आणून देते, त्याच प्रमाणें तालाचें बंधन हें संगीताचें खरें सामर्थ्य लोकांच्या प्रत्ययास आणून देते. लय, ताल, स्वर, आलाप या सर्वांच्या एकरूपतेनें अंतःकरणास किती आनंद होतो याचें वर्णन करणें खरोखरीच अत्यंत दुर्घट आहे.

॥ तुज पहातां विठ्ठला देह भात्र हरपला ॥

हें जसें भक्तांनीं ह्मटलें आहे तसेंच रसिक मनुष्य ताल स्वरबद्ध गायन कानावर पडतांच ह्मटल्या वांचून राहणार नाहीं. गायन वादनानें मोहित न होणारा तो खरोखरीच,

॥ सवै मुक्तो ऽथवा पशुः ॥

असाच असला पाहिजे. कोणत्याही विषयाकडून मन आकर्षण करून घेण्याची शक्ति संगीतांतच आहे. संसारांतील दारिद्र्यादि दुःखें विसरण्याला संगीत ही एक जादूची कांडीच आहे. अंतःकरणांत कोमलता उत्पन्न करून सर्वांचाच एकमेकाशीं व्यवहार प्रेममय करण्यास संगीत हे एक लोकत्तर साधन आहे. कोणत्याही प्रकारच्या दुर्व्यसना पासून सोडविण्यास संगीतासारखें बलवत्तर दुसरें साधन सांपडणें कठीण आहे. आह्मी संगीताचे शोकी ह्मणूनच एवढी संगीताची प्रशंसा करितों असें नसून पाश्चात्य देशांत सुद्धां संगीताची महती कितीतरी लोकांच्या प्रत्ययास आली होती याचें प्रतिबिंब खालील उताऱ्यावरून सहज लक्षांत येईल.

" Music has a harmonizing effect. The cultivation of the art has a most favourable influence upon public morals. It furnishes a source of pleasure in every family. It gives home a new attraction. It makes social inter-course more cheerful. Father Mathew followed up his temperance movement by a singing movement. He promoted the establish--ment of musical clubs all over Irland; for he felt, that, as he had taken people's whiskey from them he must give them some wholesome stimulus in its, stead. He gave them music. Singing classes were established to refine the taste, soften the manners & humanize the mass of the Irish people")

(Thrift 302)

जनतेला कोणत्याही दुर्व्यसनांतून मुक्त करून त्याचे परस्पराशी चालू असलेले व्यवहार प्रेममय करून त्यानां सुखी करण्याचें संगीत हें एक दिव्य औषध आहे असेच सर्वांनुमतें अनुभवावरून ठरत आहे.

अशा प्रकारची ही मधूर व हितकारिणी संगीतविद्या सर्व स्त्री-

पुरुषांना सुलभ व्हावी, त्यांनां तिचें रहस्य समजावें या हेतुनें आह्मी येथें संगीताचें सशास्त्र शिक्षण मोफत देण्याकरितां "**श्री जगद्गुरु संगीत विद्यालय**" या नांवाचें विद्यालय काढलें आहे. या विद्यालयाचा मुख्य उद्देश असा आहे कीं, शक्य तितक्या स्त्री पुरुषांना संगीताचें सशास्त्र शिक्षण मोफत देऊन, समाजोन्नतीला हातभार लावावयाचा; संगीत ही विद्या हलक्या दर्जाची नसून तिची योग्यता फार मोठी आहे, असें लोकांच्या निदर्शनास आणावयाचें इत्यादि हेतु या विद्यालयाचे आहेत. तांडव नृत्यसमयीं श्रीविश्वेश्वराच्या डमरूंतून व्याकरणाची मूलभूत तत्वें निघते वेळीं, गायन व नृत्य ताल बद्ध झालें अशी आख्यायिका आहे; व अर्जुनानें विराट राजाचे दरबारी मुलींना नृत्य शिकविलें आहे. यावरून अत्यंत प्राचीन कालींही अनेक राज महाराजांच्या अंतःपुरांत सुद्धां गायन नर्तनाचा पूर्णपणें प्रवेश होता इत्यादि इतिहासावरून संगीत विद्येस प्राचीन कालीं लोक किती महत्व देत होते हें सहजच दिसून येईल. तसेंच या संगीत विद्येचा सांगोपांग विचारकरण्या करितां संगीतरत्नाकरासारखें मोठमोठे ग्रंथही महामुनींनी निर्माण केलें

यावरूनही या विद्येची महती ध्यानीं येण्यासारखी आहे. मात्र काळाच्या विपरीत फेऱ्यामुळें, संगीत कायम राहिलें परंतु त्याचे शास्त्रीयत्वमात्र बाजूला पडलें. शास्त्रीयरीत्या स्वर ह्मणजे काय? ते किती आहेत, ताल, व लय ह्मणजे काय? तसेंच नर्तन कसें असतें वगैरे माहिती फारच थोड्या लोकांना आहे. शास्त्रीयरीत्या गायन वादन पुढें मांडणाऱ्या, संस्था फारच थोड्या आहेत. ही शास्त्रीय शिक्षणाची उणीव अंशतःतरी भरून निघावी, कुलीन स्त्री पुरुषांना सशास्त्र संगीत विद्येचा परिचय व्हावा व तद्वारा समाजोन्नती व्हावी अशा हेतूनें मोफत शिक्षण देणारें विद्यालय स्थापिलें, व देशांतील जनतेला तालाचें व लयीचें सशास्त्र स्वरूप काय आहे ते, सुलभ व अगदीं थोडक्यांत समजाऊन देण्याकरितां, शास्त्रीय ताल प्रकाश नांवाचें हें लहानसें पुस्तक प्रथम प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत ताल, मात्रा, लय, व त्या त्या तालांचे पखवाजावर किंवा तबल्यावर वाजविण्याचे ठेकेही दिले आहेत. ईश्वर स्तुतिपर आणि उपदेशपर अशा रीतीचा अर्थ त्या प्रत्येक ठेक्याचा दाखऊन संगीतद्वारा समाजाचे नैतिक वळण दृढ करण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे. या पुस्तकाच्या सहाय्यानें तालाचें शास्त्रीय स्वरूप लोकांच्या

नजरेस येईल अशी दढतर अशा आहे. व्यवहारांत येणारे बहुतेक सर्व ताल या पुस्तकांत दिल्यानें हल्लींच्याकाळीं प्रचलीत असलेल्या संगीताचें मर्म व त्याची तालाशी एकरूपता वगैरे गोष्टींचें ज्ञान या पुस्तकाच्या अभ्यासानें होईल. असा आह्मांस दढ भरंवसा आहे. तथापि, यापुस्तकाचा, प्रत्यक्ष उपयोग किती होतो व त्याची खरी योग्यता काय आहे याचा निर्णय देण्याचें कार्य आह्मी आमच्या रसिक संगीताभिलाषी सूज्ञांवरच सोपवून ही प्रस्तावना पूर्ण करितो.

धों. का. ब्रह्मणाळकर

सांगली १-७-१९२४

आत्मनिवेदन.

परमेश्वर कृपेनें बरेच दिवस मनांत वसत असलेला हेतू अंशतः तरी सफल झाला याबद्दल आम्हांस आनंद वाटत आहे. परमपूज्य कै. गु. नानासाहेब पानसे यांचेपाशीं अदमासें बारा वर्षे राहून गायन, वादन, वगैरे संगीत शास्त्राचें ज्ञान संपादन करतां आलें हें आमचें महद्भाग्य होय. हें ज्ञान संपादन करण्यांत आमचे वडील बंधू कै. काशीनाथबुवा (श्री जगद्गुरु शंकराचार्य संकेश्वर व करवीर पीठ) यांनीं आम्हांला बिनमोल साहाय्य केलें हें येथे सांगणें आवश्यक आहे. गु. नानासाहेब यांनीं जें कांहीं ज्ञान आम्हांला दिलें त्याचा सर्वत्र प्रसार व्हावा अशी इच्छा होती. या इच्छेस मूर्तस्वरुप येउन आज एक वर्ष होऊन गेलें आहे. सांगली येथें "**श्रीजगद्गुरु संगीत विद्यालय**" या नांवाची एक संस्था गतवर्षी काढली आहे. या विद्यालयाची एक शाखाही जुन्या सांगलींत काढली आहे. या विद्यालयांत गायन, वादन, व कीर्तन वगैरे विषयांचे ज्ञान मोफत दिलें जातें आतां या विद्यालयास सर्व बाजूनीं जें सुसंघटित स्वरूप प्राप्त झालें आहे. त्यांचें श्रेय विद्यालयाचें सेक्रेटरी रा. रा. नागोपंत नवलगुंदकर व असिस्टंट रा. नारायणराव पतकी यांना दिलें पाहिजे. या उभयतांनीं आपला बी. ए. चा अभ्यास वगैरे संभाळून विद्यालयाची जी सेवा चालविली आहे याबद्दल त्यांची स्तुती करावी तितकी थोडीच आहे. त्याचप्रमाणें श्रीमती सौ. कृष्णाबाई आपटे यांनी सदर पुस्तकास १०० रु. देणगी दिली याजबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहोंत.

सांप्रत कालीं संगीत विषयांवर अनेक पुस्तकें तज्ज्ञ लोकांनीं लिहिलेलीं आहेत. पण तबला अगर मृदंग या विषयांवर फारच थोडीं पुस्तकें लिहिलेलीं आहेत. या करतां प्रथम " शास्त्रीय ताल प्रकाश " हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहोंत. अशा रीतीनें सर्वत्र ज्ञानाचा प्रसार करण्याचे योजिलें आहे. या पहिल्या भागांत देशी १२० तालांपैकीं ३८ ताल दिलें आहेत प्रत्येक तालाची शक्य तितकी छाननी करून सर्वांना आकलन होईल अशी सशास्त्र माहिती दिली आहे. या पुस्तकांतील हंसक्षीर न्यायानें दोष टाकून देऊन जें कांहीं गुण असतील त्यांचें सेवन करावें अशी वाचक वर्गांना विनंती आहे. यांतील गुण गु. नानासाहेब यांचें असून दोष हें आमचे आहेत असें समजावें. या पुस्तकांसंबंधी ज्या कोणास कांहीं सूचना करावयाच्या असतील त्यांनीं त्या जरूर आमचें कडे पाठवाव्यात त्या सूचनांचा सहानूभूतीपूर्वक आम्ही विचार करूं.

या पुस्तकांसंबंधी ज्यांनीं ज्यांनीं आम्हाला मदत केली त्या सर्वांचें आम्ही अत्यंत आभारी आहोत.

शेवटीं सर्व लोकांस हें पुस्तक प्रिय व उपयुक्त होवो, आणि उत्तरोत्तर सरस्वतीची अधिक अधिक सेवा घडो, अशी त्या भक्तकामकल्पद्रुम परमेश्वराची प्रार्थना करून आम्ही लेखणी खालीं ठेवतों.

ग्रंथकर्ता.

॥ श्री आनंदमूर्ती प्रसन्न. ॥

शास्त्रीय ताल-प्रकाश.

प्रकरण १ लें.

❀ ताल ❀

मंगलाचरण.

अविरलमदजलनिवहं भ्रमरकुलानीकसेवितकपोलम् ॥
अभिमतफलदातारं कामेशं गणपतिं वन्दे ॥ १ ॥
सरस्वति नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणि ।
विद्यारंभं करिष्यामि सिद्धिर्भवतु मे सदा॥ २ ॥
रघुनाथं गुरुं शांतं नित्यं सद्विग्रहाश्रयम् ॥
ब्रह्मैक्यदं स्वशिष्याय तन्नमामि महामुनिम् ॥ ३ ॥
कृष्णातटनिवासाय लसत् श्रीपदशालिने ॥
व्यक्ताव्यक्तस्वरूपाय नम आनंदमूर्तये ॥ ४ ॥
नानामार्गैर्लयो यत्र यतीनां स्यात् कलानिधौ ॥
तं दाक्षिणं शिवं नौमि चित्रं वृत्तिमयं ध्रुवम् ॥ ५ ॥

संगीत शास्त्र हें तालावर अधिष्ठित आहे. संगीतशास्त्ररूपी इमारतीचा पाया ताल हा आहे. हा पाया कच्चा असेल तर ही इमा-

रत ढांसळून पडेल यांत मुळींच शंका नाहीं. एखाद्यास संगीताचें ज्ञान कितीही असो. जर त्यास तालज्ञान नसेल किंवा कमी असेल तर त्याच्या ज्ञानाला फारशीं किंमत देतां यावयाची नाहीं. तालाविषयीं शास्त्रकार ह्मणतात:--

गीतं वाद्यं तथा नृत्यं यतस्ताले प्रतिष्ठितम् ॥

अर्थः-- गाणें, वाजत्रिणें व नृत्य हें सर्व तालावर अवलंबून आहे. यावरून तालाचें महत्व कळून येतें तेंव्हां मुख्य तालज्ञान असणें अत्यंत आवश्यक आहे. प्रथम संगीत ह्मणजे काय हें पाहूं. हल्लीं प्रचारांत संगीत हा शब्द गायन या अर्थीं वापरतात परन्तु शास्त्रीय दृष्ट्या याचा अर्थ भिन्न आहे. ग्रंथकार ह्मणतात:--

गीतं वाद्यं तथा नृत्यं त्रयं संगीतमुच्यते

या संगीताच्या व्याख्येवरून असें स्पष्ट दिसून येतें कीं संगीत ह्मणजे फक्त गायन नसून त्यांत गायन, वादन, व नर्तन या तिहींचाही समावेश होतो. गीत, वाद्य, व नृत्य अशी संगीताचीं तीन अंगें आहेत. आणि ह्या तीन्हीं अंगांचा ताल हा आत्मा आहे असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. संगीत शास्त्रांत सर्वत्र व्यापून राहाणारा जो ताल त्याचे या प्रकरणांत शास्त्राधारें विवेचन करण्याचें योजलें आहे

प्रथम तालाचें स्वरूप काय आहे तें पाहूं

कालोलघ्वादि मितया क्रियया संमितो मितिम्
गीतादेर्विदधत्तालः सच द्वेधा बुधैः स्मृतः ॥ १ ॥

काल हा सुर्याच्या गतीवरून मोजावयाचा असतो. तेव्हां तो अनादि व अनंत आहे. हा काल लघु, गुरु, व प्लुत या मात्रांनीं आणि त्याचप्रमाणें सशद्व व निःशद्व या क्रियानीं युक्त होऊन गीतादिकाचें प्रमाण दाखवूं लागला म्हणजे त्यास तालाचे स्वरूप प्राप्त होतें. तालाचे मार्गताल व देशीताल असें होन प्रकार आहेत. हे तालाचे सामान्य स्वरूप किंवा लक्षण झाले आतां मार्ग ताला संबंधानें थोडी माहिती देतो.

मार्ग देशी गतत्वेन तत्राद्यस्य क्रिया द्विधा ॥
निःशब्दा शब्दयुक्ताच निशब्दातु कलोच्यते ॥ २ ॥

मार्ग व देशी तालाच्या सशब्द व निशब्द अशा दोन प्रकारच्या क्रिया आहेत. निशब्द क्रियेला कला असेंही ह्मणतात. या ठिकाणीं सशद्व व निशद्व क्रिया ह्मणजे काय हें सांगणें जरूर आहे. सशद्व क्रिया ह्मणजे टाळी वाजविण्याची क्रिया व निशद्व क्रिया ह्मणजे

टाळी न वाजविण्याची क्रिया होय. मार्ग तालामध्यें सशद्ब क्रियेचे चार व निशद्ब क्रियेचे चार असें आठ प्रकार आहेत.

स्यादावापोथ निष्क्रामो विक्षेपश्च प्रवेशकः
निःशद्बेति चतुर्धोक्ता सशद्बापि चतुर्विधा ॥ ३ ॥
ध्रुवः शम्पा ततस्तालः संनिपात इतीरिता

सशद्ब क्रियेचे प्रकारः— १ ध्रुव २ शंम्पा ३ ताल ४ संनिपात
निशद्ब क्रियेचे प्रकारः— १ आवाप २ निष्क्राम ३ विक्षेप ४ प्रवेशक.

पातः कलाच साज्ञेया तासां लक्ष्माभिदध्महे ॥ ४ ॥

टाळी वाजवितांना एका हातावर दुसरा हात पडण्याची जी क्रिया तिला पात असें ह्मणावें, याला कला असेंही ह्मणतात. आतां सशद्ब प्रकारांचा विचार करूं.

ध्रुवो हस्तस्य पातः स्याच्छोटिका शद्बपूर्वकः
शंम्पा दक्षिण हस्तस्य तालो वामकरस्य तु ॥ ५ ॥
उभयोः संनिपातः स्यात्तासां मार्गवशान्मितिः ॥ ६ ॥

एका हाताचा दुसऱ्या हातावर जो शद्बयुक्त पात होतो त्यांस

ध्रुव असें ह्मणावें. उजव्या हाताचा डाव्या हातावर पात झाला ह्मणजे त्यांस शम्पा, आणि डाव्या हाताचा उजव्या हातावर पात झाला ह्मणजे त्यास ताल ह्मणतात. दोन्हीही हाताचा एकदम पात झाला ह्मणजे तो संनिपात होतो. आता निःशब्द प्रकार पाहूं.

आवापस्तत्र हस्तस्योत्तानस्यांगुलि कुंचनम् ॥
निस्क्रामोऽधस्तलस्य स्यादंगुलीनां प्रसारणम् ॥ ७ ॥
क्षेपोदक्षिणपार्श्वस्योत्तानस्य प्रसृतांगुलेः ॥
विक्षेपोऽधस्तालस्यास्य प्रवेशो ऽलिकुंचनम् ॥ ८ ॥

उत्ताण्या हाताची सर्व अंगुलि (बोटें) आखडली असतां आवाज होतो, आणि पालथ्या मुठीची अंगुलि पसरली असतां निष्क्राम होतो. उजवा हात उताणा धरून त्याचा क्षेप करावा [तो थोडासा हालवावा.] ह्मणजे विक्षेप हा प्रकार होतो. उजवा हात पालथा करून अंगुली आखडावी ह्मणजे या प्रकारास प्रवेशक असें ह्मणतात. आतां मात्रा ह्मणजे काय याचें विवेचन करूं.

पंचलध्वक्षरोच्चार मिता मात्रेहकथ्यते ॥
अनया मात्रयात्रस्याल्लघुगुर्वादिकल्पना ॥ ९ ॥

सर्व साधारण रीत्या " निमेषकालो मात्रास्यात् " अशी मात्रेची

व्याख्या आहे. परंतु मार्गतालांतील मात्रेंच स्वरूप थोडेसे भिन्न आहे मार्गताला प्रमाणें कचटतप हें मात्रेचे प्रमाण आहे. कचटतप चा उच्चार जेवढ्या वेळेंत होतो तितकाच वेळ एका मात्रेस लागतो. या मात्रेच्या कालावरूनच लघु, गुरु, प्लुत यांचें प्रमाण ठरलें आहे. पांच लघु अक्षरांचा उच्चार करणेस [कचटतप या अक्षरांचा] जितका काल लागतो त्यास लघु ह्मणतात. दहा लघु अक्षेर उच्चारण्यास लागणाऱ्या कालास गुरु. व पंधरा लघ्वक्षरे उच्चारण्यास लागणाऱ्या कालास प्लुत असें ह्मणावें. याप्रमाणें मार्गतालाचें सामान्य दिग्दर्शन झालें. येथें मार्गतालाचें विवेचन आह्मी पुरें करितों. वास्तविक मार्गतालाचा या पुस्तकाशीं कांहीं संबंध नाहीं कारण या पुस्तकांत आह्मी फक्त देशी तालच दिले आहेत. परंतु मार्गतालाची माहिती ओघानेंच प्राप्त झाली ह्मणून ती अगदीं संक्षेपांत दिली आहे. तालविषयीं पुढें आह्मी सांगोपांग चर्चा करणार आहोंच सध्यां इतकी चर्चा पुरें आहे. आतां देशी तालाकडे वळूं या. प्रथम देशी तालाचें सामान्य लक्षण काय आहे तें पाहूं.

देशीतालस्तु लघ्वादिमितया क्रियया मतः ॥ १० ॥
यथाशोभं कांस्यतालध्वननादिकया मतः ॥
अर्धमात्रा, द्रुतोमात्रा, त्रितयं प्लुत उच्यते ॥ ११ ॥

देशी ताल हा लघु, गुरु, प्लुत, व द्रुत यांनीं नियमित असा आहे. परंतु हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं या देशी पद्धतींत ज्या योगानें गायन वादन व नृत्याला शोभा येईल अशा प्रकारचा ताल दिला पाहिजे. एकादे वेळीं चार किंवा सहा लघु अक्षरांची मात्रा कल्पून तदनुसार ताल द्यावा लागेल. सारंश गायन पद्धतीस जमेल असा ताल दिला पाहिजे. ताल देतांना त्याचे तीन प्रकार किंवा क्रिया होतात त्या सशब्द, निःशब्द आणि मान या होत. किंवा प्रचारातील भाषेत बोलावयाचे झाल्यास ताल, काल व मान या होत. टाळी वाजविण्याच्या क्रियेस सशब्द. टाळी न वाजविण्याच्या क्रियेस निःशब्द आणि एकामागून दुसरी टाळी दिली असतां त्या दोन्ही मध्यें अवकाश राहातो त्यास मान अशीं नांवें दिलेलीं आहेत. हें अधिक स्पष्ट करण्यास एक उदाहरण घेऊं

तालः— दादरा.

मात्रा ३ आघात २ काल १ मान १

ठेका.

धातिन धा धा तीना

या ठेक्यांत ज्या अक्षरावर उभी रेघ आहे त्या; अक्षराचा उच्चार करते वेळी आघात करावयाचा आहे. आडवी रेघ ही कालदर्शक समजावी दोन अघाता मध्यें तिन्ह्या वेळीं जो अवकाश राहतो त्याला मान असें ह्मणतात. य प्रमाणें ताल; काल व मान असे तीन प्रकार आहेत. येथपर्यंत देशी तालाचें सामान्य परीक्षण झालें आतां कांही विशेष अशा गोष्टी संबंधी विवेचन करणें जरूर आहे. वरील दादऱ्याच्या ठेक्यावरून हें लक्षांत येईल कीं, हा ठेका प्रचारांतील ठेक्याहून भिन्न आहे. प्रचारांतील ठेका असा आहे.

नां धिन नाना तीना

या प्रचारांतील ठेक्यामध्यें विशेषत: धा व ना या अक्षरांनी फरक झालेला दृष्टीस पडतो. या दोन ठेक्यापैकीं शास्त्रोक्तच ठेका बरोबर आहे. धा हें अक्षर सर्व अक्षरामध्यें श्रेष्ठ आहे. तेव्हां त्या अक्षरावरच सम आली पाहिजे याविषयीं शास्त्रकार ह्मणतात:—

मृदंगवादने वर्णा बहवः कल्पिता बुधैः ॥
तेषु सर्वेष्वपि सदा मुख्यो धैव प्रकीर्तितः ॥ ११ ॥

यावरून 'धा' हें प्रमुख अक्षर आहे हें सिद्ध होतें. ह्मणून त्या अक्षरावर सम ही आली पाहिजे. प्रचारांतील ठेक्यांमध्यें 'ना' या वर्णावर सम येते यास्तव प्रचारांतील ठेका चुकीचा आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आरंभी 'धा' हा वर्ण आलाच पाहिजे व तीच पद्धत सर्वत्र चालू आहे, परंतु धा हें अक्षर आरंभी आलें पाहिजे, याची जाणीव फारच थोडक्या लोकांना असते यास्तव तशा प्रकारचा मुद्दाम खुलासा केला आहे. कांहीं तालांची पुनरुक्ति झालेली आहे. ह्मणजे मात्रा सारख्याच असून भिन्न भिन्न स्वरुपें दृष्टीस पडतात. ग्रंथकार ह्मणतात.

लयः शोणितरूपेण मात्रा नाडी स्वरूपतः ॥
घाता अवयवाश्चैव ताले वै पुरुषाकृतिः ॥ १२ ॥

यावरून तालपुरुषांचे 'लय' हें रक्त आहे 'मात्रा' ह्या नाड्या आहेत, आणि 'अघात' हे अवयव आहेत. या तीन्ही पैकीं एकाचा जर अभाव होईल तर या महापुरुषाचें जीवित चालणें अशक्य आहे.

,अघात' हे अवयव आहेत. अघात कमी अधीक झालें कीं तालाची भिन्न स्वरूपें होणारच. स्वरूप भेदाच्या योगानें कोठें कोठें पुनरुक्ति होणारच, अशा प्रकारच्या पुनरुक्तीनें ताल दूषित तर ठरत नाहींच. परंतु उलट तालामध्यें विशेष कौशल्य दिसून येतें. गायनाचे वेळीं ताल हा दिलाच पाहिजे. ग्रंथकार ह्मणतातः—

गांधर्वमार्गकुशलः कांस्यतालधरोपरः ॥
गातुः सहायकर्ता स्यात्प्रमादविनिवृत्तये ॥ १३ ॥

गायक कितीही गायनपटु असला तरी त्याच्या हातून कधींच चूक होणार नाहीं असें कोणालाच ह्मणतां येणार नाहीं. सर्व साधारण असें धरून चाललें पाहिजे कीं, क्वचित् प्रसंगी प्रमाद होणें सहाजिक आहे. गायनाचें वेळीं ताल धरला तर मात्र प्रमाद होणार नाहीं व जरी झाला तरी सुधारण्यास फार सुलभ जाईल. ह्मणून श्रेयस्कर आहे. ताल देणाऱ्यास देखील गायन व वादन याची पूर्ण माहिती असणें अत्यंत अवश्यक आहे. या प्रमाणें तालाचें शास्त्राधारें थोडक्यांत विवेचन केलें आहे. यावरून वाचकांना तालाचें स्वरूप कळून येईल, आणि त्याबरोबर तालाची माहीतीही लक्षांत

येईल. अद्याप तालाविषयीं लिहिण्याजोगे पुष्कळ आहे तें यथाक्रम व यथावकाश देऊं इतकें सांगून आह्मी या ताल प्रकरणाची तूर्त रजा घेतो.

प्रकरण २ रें.

❀ वर्ण. ❀

मागील प्रकरणांत तालासंबंधी विवेचन केलें आहे. आतां या प्रकरणांत वर्णा विषयीं अनेक दृष्टीनें विचार करूं.

शास्त्रकार ह्मणतात—

ङवर्जितः कवर्गश्च तट वर्गौरहावपि ॥
इतिषोडशवर्णाःस्युरुभयोः पाठसंज्ञकाः ॥ १ ॥

या वरून अनेक वर्ण आहत असें ह्मणण्यास हरकत नाहीं' त्यातील सोळा वर्ण मुख्य असून नेहमीं प्रचारांत येणारे आहेत. ते

सोळा वर्ण खालील लिहिल्या प्रमाणें:—

" क. ख. ग. घ. त. थ. द. ध. न. ट. ठ. ड. ढ. ण. र आणि ह " ही मुळाक्षरें तबल्यांत खालील प्रमाणें काढावयाचीं असतात.

एकाक्षरी नोटेशन.

क	का	कि	की	क्डान्	डन्	द	दा
गि	गी	गा	गत्	गिन्	तेत्	धित्	ध्री
टी	ठ	ड	डा	डान्	थोन्	ख	ग
तत्	तित्	तिन्	ता	तेन्	धिं	खुं	ट
त्र	थ	था	थु	थुन्	कत्	घिन्	त
दी	दिं	धा	धी	धु	घी	ण	दि
ध्डान्	ना	र	री	क्डी	ढ	त्री	धेत्
न	नुं	रा	ह	धि	ती	त्रान्	म

हीं अक्षरें तबल्यावर कशी वाजवावयाची या संबंधी माहिती खालीं देतो. प्रथम तबल्यावर थाप कशी मारावी हें सांगणें जरूर आहे.

शाईवर करंगळी टेकून करंगळी जवळील तीन बोटांचा आघात करून तीं तीन बोटें अंतराळी केलीं असतां जो आवाज निघतो त्यास थाप असें ह्मणतात.

एकाक्षरी नोटेशन मधील अक्षरें काढण्याची रीत

१ डग्यावरील शाईवर दाबून आघात केला असतां त, थ, तत्, कत् गत्, तित्. हीं अक्षरें निघतात.

२ तबल्यावर थाप मारली असतां का, क, ता, आणि था, द्दी, अक्षरें निघतात.

३ करंगळीजवळील २ बोटांनीं शाईवर [तबल्याच्या] दाबून आघात केला असतां कि, की, ति, ती, हीं अक्षरें निघतात.

४ डग्याच्या शाईवर दाबून प्रहार करून निमिषमात्रानें तबल्यावर थाप द्यावी ह्मणजे क्डान् हें अक्षर होतें.

५ तबल्याच्या शाईवर करंगळीकडून क्रमानें चारी बोटांचा आघात केला असतां क्डि, त्रि, त्रान् आणि त्र हीं अक्षरें निघतात.

६ तबल्याच्या शाईवर चार बोटांनीं मोकळा आवाज काढला असतां

ख, खुं, घिन्, थुं. थु, थों, दिं, घिं, आणि म* हीं अक्षरें निघतात.

७ डग्यावर चारी बोटांनीं मोकळा आवाज काढला असतां ग, गा, गि, गी, घि, घी, गिन्, घिन्, द, दा, दि, दी, आणि धु हीं अक्षरें निघतात.

८ तर्जनीनें तबल्याच्या शाईवर दाबून आघात केला असतां ट, टि, र, रा, री हीं अक्षरें निवतात.

९ तबल्यावर करंगळीकडील तीन बोटांनीं दाबून आघात करावा ह्मणजे ड, ढ, ध हीं अक्षरें होतात.

१० तबल्याच्या शाईवर तर्जनीनें मोकळा आवाज केला असतां कडान्, डान्, तिन्,तेन् हीं अक्षरें निघतात.

११ अंगठ्या जवळच्या बोटानें तबल्याच्या चाटेवर (काठांवर) प्रहार केला ह्मणजे ण,न,ना, ही अक्षरे होतात.

१२ तबल्याच्या शाईवर चारी बोटें दाबून आघात करावा ह्मणजे. तत् हें निघेल.

१३ तबल्यावर उजव्या हातानें थाप मारून त्याचवेळीं डग्यावर डाव्या हतानेंही प्रहार करावा ह्मणजे धा, धि, धी, हीं अक्षरें निघतात.

---

* म हें अक्षर शास्त्रांत नसून प्रचारांत असल्यामुळें त्याला "शास्त्रात् रूढिर्बलीयसी" या न्यायानें जागा देणें आवश्यक आहे.

१४ चारी बोटांनीं दोन्ही बाजूस ह्मणजे तबल्यावरच्या व डग्यावरच्या शाईवर दाबून आघात केला ह्मणजे धत्, धेत्, धित् हीं अक्षरें निघतात.

१५ वरील प्रमाणें तबल्यावर प्रहार करून त्याचवेळीं डावे बाजूस डग्यावर आघात करावा ह्मणजे. ध्र,ध्री ही अक्षरें निघतील.

१६ वरील प्रमाणें तबल्यावर आघात करून त्याचवेळीं डावे बाजूस डग्यावर आघात करावा ह्मणजे ध्डान् हें अक्षर निघतें

वर्ण

आतां अभ्यासाकरितां नेहमी उपयोगांत येणारे दोन व चार अक्षरीं शद्बांचें नोटेशन देत आहे.

२ अक्षरी शद्बांचें नोटेशन.

धिंता	किट	तक	नग	तिट	धाग
धाधीं	त्रक	धिट	धुम	गदि	गन
धेत्ता	तट	कद्धा	नगन्	धडन्	कडधा
धात्र	गद्दी	धृक	थुंगा	तकथुं	तक्का
धाथुं	कधा	धिधी	दिंदिं	गदि	धेद्धा
नाना	नाधीं	नाती	धाधा	नाधा	तीना
धींना	तगन्	धाधिन्	गन	धाता	ताधा
घिघी	धुम	तेत्ता	कडांधा	धित्ता	तद्धा

४ अक्षरी नोटेशन.

धाधाधिंता	धुमाकिट	किटतक	तिरकिड	धिरकिड	ननागिन
किटाकिट	नगनग	धिंधिकिट	घिघिकिट	नगातिड	नगाकिट
धारिकिट	धिडनग	तगातिट	धागातिट	कडधाकडधा	धित्ताधित्ता
धिधिदिंदि	तकथुंगा	तक्काथुंगा	तत्थुंगा	धडन्नधा	कडधान्धा
त्रकधेत्ता	हरदटें	खुंखुगिड	ननागिड	दिनदिन	गदिगदि
त्रकतागी	धिनतट	घिनतट	तागिन्नधा	टधाटधा	तरान्नधा



❀ प्रकरण तिसरें ❀

ठेके

या प्रकरणांत आह्मीं ३८ ठेके दिलेले आहेत. प्रथम ताल, नंतर त्याची देवता, मात्रा, आघात, काल, ठेका आणि त्या ठेक्यांचें नोटेशन वगैरे क्रमानें देत आहों. तालांचे अर्थ कांहीं ठिकाणीं दिलेले आहेत. बऱ्याच तालांची प्रमाणें दिलीं आहेत. सारांश तालासंबंधी सर्वांग सुंदर भरपूर माहिती दिलेली आहे. ते ताल येणेंप्रमाणें:—

१

ताल:—दादरा (चंपक)

देवता – चंद्रशेखर.

मात्रा ३ आघात २ काल १

ठेका. [सशास्त्र.]

धुं तिन् धां धा तीना किंवा "धुं गीनां धा तूना"

ठेका (प्रचारांतील)

नुं धीं नां ना तींना.

ठेक्याचा अर्थ

हे विधात्या दुसऱ्याचें धन चोरून घेण्याची बुद्धी कोणालाही देऊं नकोस.

नोटेशन.

मात्रा	१	१	१
वर्ण	धातिन्	धाधा	तीना
,,	नाधी	नाना	तीना

२

ताल:— गजल.

देवता– हनुमान.

मात्रा ३॥ आघात १ काल १

ठेका

धिंन् नाना तिन् ता त्रक.

* **सूचना**:— ज्या अक्षराखालीं टिंब दिलें आहे त्या ठिकाणीं सम, ज्यावर उभी रेघ दिली आहे त्या ठिकाणीं आघात, आणि ज्या अक्षरावर आडवी रेघ दिली आहे तेथें काल आहे असें समजावें.

नोटेशन.

मात्रा	१	१	½	१
वर्ण	धिन्	नाना	तिन्	तात्रक

३

ताल:— केरवा.

देवता:– नांदिकेश्वर.

मात्रा ४ आघात १ काल १

ठेका

धागिनतिनक धिन

नोटेशन.

मात्रा	१	१	१	१
वर्ण	धागि	नति	नक	धिन

४

ताल:— धुमाळी

देवताः— विष्णू

मात्रा ४ आघात ३ काल १

ठेका.

धी धी ना ती ना धी धी ना

वरील ठेक्याचा अर्थ.

हे परमेश्वरा मला दुर्व्यसनापासून परावृत्त कर.

नोटेशन.

मात्रा.	१	१	१	१
वर्ण.	धीधी	नाती	नाधी	धीना

५

तालः— झंपा.

॥ देवताः— रुद्र. ॥

मात्रा ५ आघात ३ काल १

ठेका.

धुं धां गि कि ट त्त धां कि ट.

वरील ठेक्याचा अर्थ.

हे गिरिजा सुता गजानना माझ्या संगीत ध्वनी पासून विपुल द्रव्य देऊन वंचका पासून माझें रक्षण कर.

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१
वर्ण	धात्	धागि	किट	तद्धा	किट

६

तालः— झपताल

देवता रुद्र.

मात्रा ५ आघात ३ काल १

सूचनाः— ताल देऊन ठेका वाजवितेवेळीं प्रत्येक मात्रेच्या आ-वकाशांत कोणते व किती वर्ण काढावयाचे ते कोष्टकांत स्पष्ट केले आहे. त्याप्रमाणें वाजिवले असतां ठेका तालबद्ध होईल.

ठेका

धुंना धींधीना तींना धींधीना

कोष्टक.

मात्रा	१	१	१	१	१
वर्ण	धींना	धींधीं	नातीं	नाधीं	धींना

७

ताल:— कंसारी

देवता विष्णू.

मात्रा ५ आघात ४ काल १

ठेका

धुां ध्निं नंग गादि गन

कोष्टक.

मात्रा	१	१	१	१	१
वर्ण	धात्	ध्निं	नग	गादे	गन

८

ताल गरूड

देवता विष्णू

ठेका

मात्रा ६ आघात ४ काल २

धा॒ धा धिन् ता गदिगन

कोष्टक.

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धिन्	ता	गदि	गन

९

ताल एका

देवता इश्वर

मात्रा ६ अगर १२ आघात २ अगर ४ काल १ अगर २

ठेका सशास्त्र

धा॒ त्रक धीना धींधीं नात्रक तूना कत्ता

प्रचारांतील ठेका.

धिं धिं धा गि त्रक धीना तिंत्तिं तागित्रक तीना

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धात्रक	धीना	धींधीं	नात्रक	तूना	कत्ता
,,	धिंधिं	धागित्रक	धीना	तिंत्तिं	तागित्रक	तीना

१०

ताल दीपचंदी

देवता चंद्र

मात्रा ७ आघात ३ काल १

सशास्त्र ठेका.

धा धिं ना ना धिं धा तिं ना ना तिं

प्रचारांतील ठेका.

ना धिं ना ना धिं ना तिं ना ना तिं

वरील ठेक्याचा अर्थ.

हे ब्रह्मदेवा मला सधन करून त्या धनाचा सदुपयोग होईल अशी बुद्धि दे.

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धिं	नाना	धिं	धातिं	नाना	तिं
,,	ना	धिं	नाना	धिं	नातिं	नाना	तिं

११

ताल तेवरा.

देवता इंद्र

मात्रा ७ आघात ३ काल १

ठेका

धुां ध्दिंन नग किट तक गदि गन.

कोष्टक.

मात्रा	१	१	१	१	१	१	१.
वर्ण	धात्	धिन	नग	किट	तक	गदि.	गन

१२

ताल समीर.

दवता वायु.

मात्रा ७ आघात ३ काल ३

ठेका.

धुां ध्रिन नंग किट तक गदिगन

कोष्टक तेवऱ्या प्रमाणें

१३

ताल पांडव

देवता कृष्ण.

मात्रा ७ आघात ५ काल २

ठेका

धुां ध्रिन नंग तिटि कत गदि गन

१ —	१ —	१ —	१ —	१ ०	१ —	१ ०
विरंची				आदिताल		

वरील तालाचें प्रमाण

र **श्लोकः**— विरंचिर्मूल तालश्च पांडवाख्यमुदाहृतः

भावार्थ. विरंची आणि आदिताल मिळून एक पांडवताल होतो.

१४

ताल- त्रिताल- [अदिताल]

देवता–गजानन अथवा. विष्णु.

मात्रा ८ आघात– ३ काल १

प्रमाण.

श्लोकः— चतुस्त्राख्योलघुर्यत्र यत्र चासीद्द्रुतद्वयम् ।
अष्टौ वर्णाश्च यत्रासांस्त्रितालो विष्णु दैवतः ॥

ठेका

धाधिं धिंता धाधिं धिंता तातिं तिंता धाधिं धिंता

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धाधिं	धिंता	धाधिं	धिंता.	तातिं	तिंता
मात्रा	१	१				
वर्ण	धाधिं	धिंता				

वरील ठेक्याचा अर्थ

हे जगन्नियंत्या गिरिजापते भवसागरांतून तरून जाण्याला तुझें नाम ही नौका आहे.

१५

ताल पंजाबी–

देवता सदाशिव. किंवा पंचवक्र

मात्रा ८ आघात ३ काल १

ठेका

धुागिनत तुधिन धागिनत तुतिन तातिनत तुधिन धागिनत तुधिन.

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धागिनत	तुधिन	धागिनत	तुतिन	तातीनत	तुधिन
मात्रा	१	१				
वर्ण	धागिनत	तुधिन				

१६

ताल—मत्त, षण्मुख, अथवा हनुमत्

देवता इंद्र

मात्रा ९ अघात ६ काल ३

ठेका

धुात्रक धींना धींधी नात्रक तूना कत्ता धींधींना धींधींना

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धात्रक	धेना	धींधीं	नात्रक	तूना	कत्ता
मात्रा	१	१	१			
वर्ण	धींधीं	नाधीं	धींना			

वरील तालाचे प्रमाण

श्लोक— तिस्त्रजातिलघुर्यत्र यत्र चासीध्रुतद्वयं ।
नवांक गण संसृष्ट स्तालो हनुमताव्हयः ॥

१७

ताल सुर्फाक्ता.

देवता-बलभीम

मात्रा १०   अघात ३   काल २

ठेका

धा धा धिं ता धा धिं ता धुम किट तक

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धिं	ता	धा	धिं
मात्रा	१	१	१	१		
वर्ण	ता	धुम	किट	तक		

वरील ठेक्याचा अर्थ

हे गिरिजानाथा, हे ब्रह्मदेवा, हे रामा, आपल्या त्रयमूर्तींच्या आशिर्वादे करून मी काढीत असलेल्या ध्वनीपासून जनतेचीं अं--त:करणें अग्निसूर्या प्रमाणें प्रफुल्लित कर.

वरील तालाचें प्रमाण.

श्लोकः— चतुःस्त्रख्यो लघुर्यत्र यत्रचासीध्रुतद्वयम् ।
यत्रसंदेशकस्तत्र मठस्याद्दशमात्रकः ॥

१८

ताल -- शनी

देवता शनी.

मात्रा ११ आघात ७ काल ४

ठेका

धा तत् धिन नग धेत् धिन नग धिन नग धुम किट

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	तत्	धिन	नग	धेत्	धिन
मात्रा	१	१	१	१	१	
वर्ण	नग	धिन	नग	धुम	किट	

वरील तालाचें प्रमाण.

श्लोक-- पर्वंतु पंचवक्त्रश्चचपकाख्यो तथैवच ।
उभाभ्यांनिर्मितस्तालो पंगु कार्याभिदोभवेत् ॥

१९

चौताल (चतुर)

देवता विष्णु

मात्रा १२ आघात ४ काल २

ठेका

धुं धा धिंता किटधा धिंता किटतक गदिगन

वरील ठेक्याचें प्रमाण.

श्लोक-- चतुस्त्रख्योलघुः पूर्वंयत्रचासीद्भुतत्रयम् ।
ततः संदेशकायत्रतालस्तुचतुरो भवेत् ॥

वरील तालाचा भावार्थ.

हे गजानना, हे ब्रह्मदेवा, हे वाग्देवी माझी बुद्धि प्रकाशित ह्मणजे सूर्या प्रमाणें करून माझें गीत गंधर्वा प्रमाणें प्रिय कर.

वरील चौतालाचें कोष्टक.

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धिं	ता	किट	धा
मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धिं	ता	किट	तक	गदि	गन

२०

वसुताल.

देवता वसू

मात्रा १२ आघात ८ काल ४

ठेका

धा धा धिं ता किटधा धिं ता किट तक गदि गन

वरील तालाचें प्रमाण.

श्लोक-- द्वादशाक्षरसंयुक्तेक्षेत्रेस्मिन्मनुजाधिप ।
यत्पंचक त्रितालाभ्यांतालस्यात्वसुसंज्ञकः ॥

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धिं	ता	किट	धा
मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धिं	ता	किट	तक	गदी	गन

वसुताल देण्याचें कोष्टक खालील प्रमाणें.

पंचकताल

| – | – | | | | –

१ १ १ १ १ १ १ १

०

त्रिताल

| | | –

१ १ १ १

सूचनाः— पंचकताल आणि त्रिताल मिळून एक वसुताल होतो.

२१

चूडामणी ताल.

देवता — विष्णु

मात्रा १३ अघात ९ काल ४

ठेका

धा॑त् धि॒न न॑क धे॒त् धि॑न न॑क धी॑न न॒क न॑क
ति॑टी क॑त ग॑दि ग॒न

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धात्	धिन	नक	धेत	धीन	नक
मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धिंन	नक	नक	तिटी	कत	गदि
मात्रा	१					
वर्ण	गन					

पंचवक्त्र

| | – | | | – | | | | | | –

१̥ १ १ १ १ १ १ १

कौंसारी

| | | | –

१ १ १ १ १

सूचना:— पंचवक्त्र आणि कौंसारी मिळून एक चूडामणी ताल होतो.

२२

ताल – धमार

देवता – हनुमान

मात्रा १४ आघात ३ काल ३

सशास्त्र ठेका

धा नधा धिं ता धिधितिट धा धिं ता क्डां नगतिट तिरकिड तकता तिटीकत गदिगन

मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	नधा	धिं	ता	धिधितिट	धा
मात्रा	१	१	१	१	१	१
वर्ण	धिं	ता	क्डां	नगतिट	तिरकिड	तकता
मात्रा	१	१				
वर्ण	तिटिकत	गदिगन				

वरील ठेक्याचा अर्थ

हे चतुराना माझ्याजवळ जी संगीत विद्या आहे ती लोकांमध्यें प्रसार करण्याची बुद्धि मला दे.

२३

ताल – जयमंगल

देवता -- कलंकी.

मात्रा १४ आघात ५ काल ५

ठेका

धु नधा धिं तां धिधितिट धा धीं तां क्डां नगतिट तिरकिड तकता तिटकित गदिगन

वरील जयमंगलाचें प्रमाण

श्लोक— षंण्मूखश्चंपको यत्र आदितालस्तथ: ।
क्रमात् चतुर्दशांक संसृष्ट तालश्च जयमंगल: ॥

षण्मूख

१ १ १ १ १ १ १ १ १

चंपक आदिताल

१ १ १ १ १

सूचना— षंण्मूख, चंपक आणि आदिताल मिळून एक जयमंगल होतो.

२४

ताल :– मत्तकाय

देवता – ब्रह्मदेव

मात्रा १४ आघात ४ काल ४

ठेका

धांत् ध्हिन नक धेत् धिंन नक धेत धेत धिंन नक तिंटी कत गदि गन

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धात्	धिन	नक	धेत्	धिन	नक	धेत्
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धेत्	धिन	नक	तिटी	कत	गदि	गन

१ १ १ १ १ १ १

१ १ १ १ १ १ १

२५

ताल--झुंब्रा.

देवता -- बृहस्पति

मात्रा १४   आघात ३   काल १

ठेका

धिं धा त्रक धिं धीं धागि त्रक तिं ता त्रक धिं धिं धागी त्रक

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धीं	धा	त्रक	धीं	धीं	धागि	त्रक
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	तिं	ता	त्रक	धीं	धिं	धागी	त्रक

झुंब्राच्या ठेक्याचा अर्थ

हे शुभमंगला, हे कामधेनो, हे वाद्देवी मला संगीतरुपी

धनानें सधन कर.

२६

ताल अडाचौ ताल

देवता -- काळ भैरव

मात्रा १४ आघात ४ काल ३

ठेका

धा̥ त्रक धीना तू॒ ना क॑ त्ता धी धी ना

धी धी ना

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	त्रक	धी	ना	तू	ना	कू
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	ता	धी	धी	ना	धी	धी	ना

२७

ताल -- सवारी

देवता -- ब्रह्मदेव

मात्रा १५ आघात ५ काल ३

ठेका

धीना धीधीना तीं तीना किट तक तूना ना धी
धीना नाधी धीना धेनाड् धेनाड्

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धी	ना	धीधी	ना	तीं	तीना	किटतक
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	तूना	नाधीं	धीना	नाधी	धीना	धेन्	आड्धे
मात्रा	१						
वर्ण	नाड						

२८

सेना – ताल

देवता - ब्रह्मदेव

मात्रा १५ आघात ४ काल ४

ठेका

धा धा धा तिं तिं तिं ता धा धा धा तिं तिट कत
गदिगन

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धा	तीं	तीं	तीं	ता
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धा	तीं	तिट	कत	गदी
मात्रा	१						
वर्ण	गन						

वरील तालाचें प्रमाण

श्लोकः—

सेनायाश्चतुरंगत्वातचतुर्घात समुद्भवः ।
तालः सेनाव्हयश्चासी त्सेनानिकरसंभवः ॥

|	−	−	−	|	−	−	−
१ ०	१	१	१	१	१	१	१
|	−	−	−	|	−	−	
१	१	१	१	१	१	१	

२९

रवी -- ताल

देवता -- सूर्य

मात्रा १७ आघात १२ काल ५

ठेका

धा धा धिन् ता तिटिकत गदिगन गदिगन धाधिन्

इन् ताआधा धादी धाधिन इन् ताआतिटि कतगदि

गनधा तिटिकत गदिगन

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धिन्	ता	तिटकत	गदिगन	गदिगन	धाधिं
मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	इन्	ताआधा	धादी	धाधिन्	इन्	ताआतिटि	कतगदि	गनधा
मात्रा	१							
वर्ण	तिटिकतगदिगन							

रवीतालाचें प्रमाण

श्लोकः—

वसुतालो विरंचिश्च उभाभ्यां रवितालकः ।
यः सप्त दशमात्राभिः सप्तयुक्तांगलक्षणम् ।।

३०

ताल–ब्रह्मताल

देवता–ब्रह्मदेव

मात्रा २१ आघात १० काल ७

ठेका

धुांध्धिन नक धेध्धिन नक धिन नक तिटिकत
गदिगन धाधा धिंता धाधिंता गदिगन

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	द्धिन	नक	धे	द्धिन	नक	द्धिन
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	नक	तिटि	कत	गदी	गन	धा	धा
मात्रा	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धिं	ता	धा	धिं	ता	गदि	गन

२१

ताल—अनंग

देवता—शंकर

मात्रा २१ आघात १० काल ७

ठेका

धा्द्धिन नक धेद्धिन नक धिन नक तिटिकत
गदिगन धाधा धिंता धाधिंता गदिगन

अनंग तालाचें कोष्टक ब्रह्मताला प्रमाणें

३२

ताल -- लक्ष्मी

देवता -- विष्णु

मात्रा २१ आघात १५ काल ६

ठेका

धा ड्डिन नक धोड्डिन नक धिन नक तिटिकत
गदिगन धाधा धिंता धा धिंता गदिगन

कोष्टक

ब्रह्मताला प्रमाणें

लक्ष्मी तालाचें प्रमाण

श्लोक—

चतुरश्वचरीकश्व वैनतेयसमारकौ ।
एक विंश त्यंकमयस्तालो लक्ष्म्याभिदो भवेत् ॥

३२

ताल -- कलाताल

(शशांक ताल)

देवता चंद्र

मात्रा २४   आघात १६   काल ८

ठेका

धुंधा धिंता तीटकत गदिगन धिंधिं इन्ता आ धाक धाति इन्ता । तिटिकत गदिगन तिरकिड तकता तिटिकत गदिगन धा तिटकत गदिगन धा तिटकत गदिगन.

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धा	धा	धिं	ता	तिटकत	गदिगन	धिंधिं	इन्ता
मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	आ	धाक	धातिं	इन्ता	आ	तिटकत	गदिगन	तिरकिड
मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	तकता	तिटिकत	गदिगन	घा	तिटिकत	गदिगन	घा	
मात्रा	१							
वर्ण	तिटिकत गदिगन							

कलातालाचें प्रमाणः—

चतुर्विंशतिमात्राभी रंजिते क्षेत्रमंदिरे ॥
वसुतालद्वयंयत्र कलातालस्तातो भवेत् ॥

३४

ताल--इंदिरा

देवता--लक्ष्मी

मात्रा २५ आघात १७ काल ७

ठेका

धाट् धा धिंता धाट् धा धिंता धुमकिट तक गदिगन धा धिंन नेग धे धिंन नेगाधेन नेग तिटिकत गादिगन.

कोष्टक

मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धाट्	धा	धिं	ता	धाट्	धा	धिं	ता
मात्रा	१	१	१	१	१	१	१	१
वर्ण	धुम	किट	तक	गदी	गन	धात्	धिन	नग
मात्रा	१	१	१	१	१	१	१	२
वर्ण	धेत्	धिन	नग	धिन	नग	तिटि	कत	गदि
मात्रा	१							
वर्ण	गन							

१ चौतालाचा दमसासचा ठेका.

धृां धा धींता कडं धूंत्ता धितीं धित्ता कतिटता
गीन धिधी दिंथुं थुं तिटकत गादिगन

सूचना:— वेराल ठेक्याचीं अक्षरें काढणें तीं खाली लिहिल्या-प्रमाणें:— धा था धींता एवढीं अक्षरें बरोबरीच्या लइत काढून पुढील अक्षरें धी धी दीं पर्यंत दि ठी लइनें वाजणें म्दणजे ठेक्या-बरोबर येइल.

दुसरी दमसास ठेका २

धृां धा धींता तिटकत गदिगन धा धींता आं
धा धा दी धां धींता आं❀ तिटकत गादिगन धा
तिटकत गदिगन धा❀

सूजनाः—फुलीपासून एक तिटकत गदिगनधा दुप्पट लयीने वाजवून. दुसरी तिटकत गादिगनधा ही चौपट लयीन वाजविणें अ-

सें तीन वेळ वाजविली असतां बरोबर समीस येइल.

चौताल बोल साथपरान १

गंदिगन धागतिट गंदिगन नागतिट तं कीटतका कीट तिटीकत गदिगन तंकीट तागिन धागि तिंपि कत गदीगन

चौताल परान २

धिंट तिट किडन गदिंग तागितिटी कत तांगी तिटी धागीतिटी गादिगन नगितिटि तांकिटत काकिट तिंटीकत गदिगन.

चौताल बोल ३

धागूदिगनधागूदिंगनधागादिगतोआतिटीकतगंदी गनधातिटींकतगदीगनधातिंटीकत गदिगन.

चौताल बोल ४

गुंदिगनधागतिटगेदिगननागतिटतकीटतकाकिट
किटतकगादिगनधुमाकिटतकधुमकिटतकगादिगन.

चौताल बोल ५

धिंत्तूधिकिटतकधीधीकिटतकधुमकिटतकगदिगन

सूचना:— वरील बोल, दुपटीने वाजिवणे म्हणजे बोल भरून दिसेल.

चौताल बोल. ६

धुंकडतत्कतिटगेदिगंनागतिटकतगदीगनक्डतत
किटतागीनधागधीताक्डधूधिकीटथुंतिटकतगदिगन.

चौताल बोल. ७

धुमकिटताकिटतकाकिटधुसकीटतंकीटतकाकिटधु मकिटधुसाकिटतंधेंन्नधूताधुमकीटगदीगन.

चौताल बोल. ८

किडनगतिटकतधिंनकतगदिगननंगतिटकतधाग तिटकतगदिगनतांगितिटीकतधागतिटकतगदिगन.

चौताल नमुन्याकरितां तयारीचा बोल ९

तिटतिटधिधीतिटगंदिगननागतिटधिंतरकिटतक तागतिटधिंगतागतिटकतगंदिगनकतिटदानंधातिटक तगदीगनधा,

सूचना:— कुदोशिंग ह्मणून एक प्रख्यात उत्तर हिंदुस्थानांत मोठे बजवय्ये होऊन गेले. त्यांची आख्यायिका अशी आहे कीं मस्तीस आलेला हत्ती मैदानांत सोडून त्या हत्तीपुढें गजलीलादि मृदंगांत बाज भरून त्या हत्तीच्या कानावर पडताच तो हत्ती कुदोशिंगाचे नजीक येऊन गुडघे टेकून तास तास डोळे झांकून बसत असें

अशी त्यांची कीर्ति आमचे कानावरही आहे. असें जे गृहस्थ होऊन गेले त्यांचाही कांहीं बाज आमचेकडे आला आहे. त्याही बाजापैकीं थोडेसे बोल आह्मी या पुस्तकांत देत आहोत. असें जे सुप्रसिद्ध बजवय्ये त्यांची शिष्यशाखा फारशी दिसत का नाहीं या प्रश्नाचें उत्तर आह्मास देणें शक्य नाहीं इतकें सांगून पुढील कार्यास आरंभ करतो.

कुदोशिंगाचा बाज ठाईच्या लईचा
बोल १०

धुंगतिटतागतिटधागदीगनागतीटक्डधाकिटधा गतिटगादिगननागातिटध्धेध्धेधिटीतिटीकत कातिट ता गिनतागातिटीकताधाधितिटी कतधीधीतिटी धिंधीतिट गादिगन धाकिट धिधितिट गांदिगनधाकिटधाधितिट गदिगन.

कुदोशींग बोल ११

धुंधाकिटतकधाक्डांध्धेधांकिटत कीटत कांकि टतकधुमकिंटतकीटतकाकिटतिंटीकतगदिगन.

सूचना:— वरील बोलांतील शेवटची अक्षरें म्हणजे तिटी कत गदिगन ती चलदीनें म्हणजे दूप्पट लइनें वाजविणें.

कुदोशिंग सात परान समेपासून सुरु करणेचा बोल १२

धुंधाकिटतकधागितिरीकिडतकघडांनधित्तानग तिरीकिटतकतकिंटतकथुं किटीतकथुं ध्डांन्गादिगन धा धाकिटितकंधूमकिटीतकधित्तात्तत्त ध्धित्ताधेध्धेध्धित्ताधि त्ताधूमाकिटीतकगादिगन.

कुदोशिंग सात परान. बोल १३

धुंकिटताकेटतकांकतातिटीधींधीतिटीदिनागिनकत्त

धिक्डानधांदिंताकत्कांटकितत्तागादिगिन्

बोल १४ कुदोशिंग ताल परान सुरु करणेची जागा ८ मात्रेपासून, तीन आवर्तानें समेस मिळणें.

क्डधान्न क्डधा किटधाकिटतकधुमाकिटतकधाधा क्डधाक्डधागीदगनधातकथैंगातकथैंगातकधे त्तागि नधाधातिन्⊛धाकिटत किटतकाकिटतकधूस किटतक गदिगनधात्धा

सूचनाः— खुणेपासून ह्मणजे फुली पासून प्रत्येक आवर्तनांत दुप्पट लईनें वाजविणें व हा बोल तीन वेळ वाजवून समेस मिळणें.

बोल १५ कुदोशिंग दीडीच्या लईनें वाजविणेची परान.

धिकिटतागिनधिकिटतागिन धिकिटकतगदिगन नगतिट*कतिटकदिनधागाधिध्धडन्नगनधा

सूचनाः– खुणेंपासून ह्मणजे फुली पासून तीन वेळ वाजविणें ह्मणजे बरोबर समीस येईल.

बोल १ धमार मात्रा १४ साथ परान

धाकिटतागिनधाधाकिटक्डधाकिटतकिटतागिन धाधाकिटक्डधाकिटक्डधाकिट तिटकत गदिगनधा क्डधाकीट तिटकत गदिगनधा क्डधाकिट तिटकत गदिगन

सूचनाः— वरील बोल तालाच्या दिडिच्या लइनें वाचविणेचा आहे.

बोल २ धमार साथ परान

गुंदिगनगादिगन धांकिटतकीटतकांकिट तकध्त्ता धेंधाकिंटधातिटकत गदिगन

बोल ३ धमार सात परान

धुंमकिटगदिगनगादिगनधांगतिटगादिगननांगतिट ताकिटतका किटकिंटतकगादिगन धुंमकिटतकधुमकिट तक गादिगन

सूचना:— वरील परान् धमारयेडवंट जयमंगल वगैरे तालांत वाजवितां येतो. कारण वरील तालांच्या मात्रा एकच आहेत. मात्रा आघात व काल निरनिराळें आहेत. सबब वाजविणेस हरकत नाहीं.

बोल ४ धमारची आड

धुंगद्धिगन धांगद्धिगन घागदिगता कडधाकिट धिकिट धान.

बोल १

त्रितालाचे बोल उर्फ परानी आड

धुंत्रकधिन्‌धिन्‌धांगित्रकातिन्‌तांत्रकातिन्‌तिन्‌ता--
गित्रंकतिन्‌तात्रक

बोल २

धुंत्रकधिकिटतकादींनाघिनधागित्रकातिंन्‌तात्रकाति
तिटिदिंनाघिनधागीत्रक

बोल ३

त्रंकधेतत्रकधेत्‌धागिनधात्रकाधिटधांगित्रकतोन्ना-
किटत्रकतेतत्रकतेतांगिनतात्रकातिटतागित्रकतुंनाकिट
त्रंकधेतत्रकधेत्‌धागिनधात्रकाधिटधा

बोल ४

धुंगिधाक्डतधिनधांगिक्डतधिनाकिनतांगितत्ताक्ड

ततिनतांगिक्डतातिनाकिन

बोल ५

तिरकिडकतातिटिकतगदिगनगंदिगनधाग तिटग दिगननागतिटतांगितिटीकतधागितिटीकतगदिगन नांगातिटकतधागातिटकतगादिगन

बोल ६

त्रंकतूनाकतिंनगातिंराकिडतकाधिराकिडतकगादिगन तिंन्तात्रकतिटिदंनघिनधागित्रकधा

बोल ७

तुंकिटधाकिटतकतंकतकधुमाकिट धिंकिटाधिकटत कतांगतिटगादिगन

बोल ८

तुंकतकधुमकिटतंकधुमकिटतकधोंगिनधागदिंगन गंदिगनधागतिटगंदिगननागातिटधिधिंतिटीकतधींधीं तिंटीकतधेतातिंटीकतगदिगन

बोल ९

धुतिंधाकिटतंकिटतकाकीटातिंरकीडतकतातिंटीक तगदिगनधा

बोल १०

धातधागितिटकतगदिगनधांकीटतकगदिगन धा धागिदिगीताधिरकिंटतकगादिगनधातधागितिटकंतग दिगनधाकिटतकगादिगन

बोल ११

किंडनगतिटीकतधिंनकतगदिगनतागितिटी कत
नगतिटीकतगदिगन

त्रितालातील मुखडे कालातन उठावणी

क्डातूनातिरकिडकिडनगधातिध्डांनकधिरकीडतक

दुसरा मुखडा

क्डधेधेतधिरकिडतकधां धिनाकिडनकनकाधिराकिटक
तकतिताकिडनगतध्डांतकधातिधाध्डांतक

तिसरा मुखडा

त्ताक्रकतूनातातींताकिडनकधिरकिडतक

सबारी मात्रा १५

धुमकिटगदिगनधाधिटीतिटीकिडनगदिगनता गि

तिटिकतधागितिटतागितिटगदिगननागितिटत किट-
तकाकिटतिटिकतगदिगन

मत्त ताल षण्मुख ताल हनुमत्तताल हे तिन्ही ताल नउ नउ मात्रेचे आहेत ह्मणून निरनिराळे बोल दिले नाहींत

मत्तताल बोल मात्रा ९

धातधागितितिटिकतगदिगनधातिटिकतगदिगन
धागदिगनताधिराकिटतक

हनुमंतताल व मठताल हे दोन्ही ताल दहा दहा मात्रेचे आहेत, आणि सुर्फक्ता झंपा हे दोन्ही दहा मात्रेचे आहेत सबब पुन्हा एक बोल खालीं दिला आहे

मात्रा १०

गदिगनधागतिटगदिगननागतिटतकिटतकाकिट

ताकिटतकाकिटतिटकतगदिगन

चुडामणीताल मात्रा १३

किटतकथुंकिटतकथुंधातकथुंगाकिटतकथुंधा गिन धाधाधाधातिंधात्तकथुंतत्थुंगातकाथुंगाकिटतकथुंकिट तकथुंताधा

शनिताल मात्रा ११

धिधितिटिगादिगननागितिटिधिंतरकिडतकतागि तिटिधिगतगातिटकतगादिगनकातिटदानधा तिटिकत गदिगन.

तव्राताल आणि पांडवताल मात्रा ७

धागद्दिगनधागाद्दिगनधागादिगताक्डाधाकिटधिकि टदानधा

रविताल मात्रा १७

धातिंधाधेत्ताक्डधातक्कातक्काथुंगातक्काथुं गातका

थोंगातकधेतातीटीकतग दिगनधाधींताधाधा दिधाधीं
तातिटीकतगदिगनधातिटीकतगदिगनधागदिगनधा.

ब्रह्मताल, लक्ष्मीताल, अनंगताल यांच्या

मात्रा २१

गदिगनधागदिगनधाधागतिटतागतिटधागदिग
नागतिटक्डधाकिटतागतिटगदिगननाग तिटधे्धे् धि
टीतिटीकतकतिटतागिनतागीतिटीकतधीधीतिटीकत
धीधीतिटीधींधींतिटगदिगनधा

इंदिरा ताल मात्रा २५ बोल

गदिगनधागतिटगादिगननागतिटतकिटतकाकीट
तकिटतकाकिटतिटीकतगदिगनधागातिटग दिगन कि
डनगतिटकतधिनकतगदिगननागतिटकतधागतिटक
तधागतिटकतगदिगनधाधींता ❀ तिटीकतगदिगनधा

सूचना:— फुलीपासून दुगणीच्या लइने तीन वेळा वाजविणे म्हणजे बरोबर तालात येईल.

पञ्चताल मात्रा ३१ बोल.

धिरकीटतकीटतागिननगनगतिटकतकतधिधीति टधीधीतिटकतकततकीटतागिनधागदिगनधागदिगन धिटातिटकीडन गदिगतागींतिटीकततागतिटधागतिट गादिगन तागतिटतकिटत काकिटतिटकतगदिगनधु मकीटताकिटतकाकीटधुमाकिटतकधुमाकिटतकधुमाकिट

टप्पा मात्रा. १६

धात्रकधींत्रकधींधात्रकधींत्रकधींधात्रकतिंत्रकतिंता त्रकधींत्रकधीं

ख्यालाचा ठेका मात्रा १६

धात्रक धींधिना नातींतींतात्रकधींधिनाना धींधीं

❀ समाप्त. ❀

सूचना.

सदर पुस्तकांत सुधारणा करून याच पुस्तकाची दुसरी अवृत्ती फारच लौकर काढावयाची आहें. म्हणजे ३६ तालांच्या ३६ चिजा, सदर चिजेचें नोटेशन, राग, देवता, सदर चिजेच्या आर्था-सहित देणार आहोत. याचें कारण ३६ ताल गवई लोकांस गाता-आले पाहिजेत. व हार्मोनियम वाजविणारास ३६ ताल व ३६ राग वाजवितां आले पाहिजेत. हार्मोनियम प्रमाणें.

सा. री. ग. म. प. ध. नी. सा. या आठ स्वराचे आठ तबले आणि कोमल तीव्र स्वरांचे तीन मिळून ११ तबले घेवून सदरच्या चिजा वाजविणेच्या आहेत. याचा अर्थ असा आहे कीं, स्वतंत्रच तबल्यांतून चीज गाऊन दाखविणेची आहे ही कल्पना आज आह्मीच काढली आहे. गुणीजन वर्गास पसंत पडून सूचना आल्यास यापुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत प्रसिद्ध करणार आहोत.

इतिशं.